सं.फौ.ख.क्र.१५०७२/२०
सरकार वि. सौरभ
निशाणी. ८ खाली

**सरकारतर्फे साक्षदार क्र. १ यांची शपथेवर सरतपासणी सुरु**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव : सिमा बंडूसिंग ठाकूर
वय : अंदाजे ३९ वर्षे,
धंदा : पत्रकार
राहणार : काटोल नाका, नागपूर.

**सरकार पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती संगिता गोगे तर्फे**

१. मी दोन्ही आरोपींना ओळखतो. ते आज कोर्टात हजर आहेत. मी दैनिक साहसिक मध्ये रिपोर्टींगचे काम करते. सदरील पेपर वर्धेवरुन निघते. आमच्या दैनिकाचे कार्यालय रजत एस टी संकुल, बसस्टॉड जवळ आहे. आमच्या वर्तमान पत्राने गॅस सिलेंडरची काळाबाजारी करणा-याविरोधात कारवाई करण्याची मोहीत चालू केली होती. सदरील मोहीमेमध्ये आम्ही नागपुरमध्ये फिरुन लोकांना समजावीतो की त्यांनी गॅसचा काळाबाजार होवू नये, त्यामुळे स्फोट होवून जीवीत हाणी होवू शकते. दि.०४.०८.२०१८ रोजी माझे वरिष्ठ पत्रकार अमजद खाण यांचेसोबत गोकुळपेठ परिसरात फिरत होतो. आम्हाला राधेशाम जनकलाल कासार यांच्या दुकानात लहान लाल रंगाचे गॅस सिलेंडर दिसले. ती दुकान भांडयाची होती. सदरील गॅस सिलेंडरमध्ये सुविधा, युनिक व इतर कंपन्यांचे सिलेंडर होते. त्यावेळेस दुकानात आरोपी सौरभ चौरसीया बसला होता. त्याला माझया वरिष्ठाने सिलेंडरबाबत विचारले. त्याने सांगीतले की सदर सिलेंडर ३ किलोचे राहाते व त्याची किंमत ९५०/- रुपयांचे आहे व सदरील सिलेंडर खरेदीसाठी कोणतेही कागदपत्र लागत नाही. सदरील गॅस सिलेंडर संपल्यास प्रति किलो १०० रुपयांप्रमाणे भरुन मिळेल. मी त्यांना विचारले की रिफीलींग करतांना स्फोट झाल्यास त्याची जिमेंदारी कोण घेणार असे विचारले असता ती जिमेदारी दुकानदाराची नाही असे सांगीतले. त्यावेळेस आम्ही त्याला सांगीतले की आम्ही प्रेसचे लोकं आहोत. तुम्ही तुमच्या दुकानातून गॅस विकने बंद करा असे सांगीतले होते.

२. आम्ही दुस-या दिवशी सुध्दा सदरील दुकानात जावून बघीतले असता गॅस सिलेंडर ठेवलेले होते त्यामुळे आम्ही अंबाझरी पोलीस स्टेशन मध्ये जावून

सदरील घटनेची फिर्यादि दिली. आता मला माझा टाईप केलेली फिर्याद, माझया हस्ताक्षरातील फिर्याद व प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **<u>नि.१० ते १२</u>** देण्यात येत आहे. त्यानंतर पोलीसांनी गुन्हा नोंदवीला व घटनास्थळी येवून त्यांनी गॅस सिलेंडर जप्त केले.

**<u>आरोपीचे वकील गैरहजर. साक्षीदाराची उलट तपासणी आरोपी क.१ तर्फे स्वत:</u>** नाकारले.

**<u>आरोपीचे वकील गैरहजर. साक्षीदाराची उलट तपासणी आरोपी क.२ तर्फे स्वत:</u>** नाकारले.

**फेरतपास - नाही**

श्रवणोत्तर स्विकृत

माझे समक्ष,

मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर
दिनांक : २१/०९/२०२२

(एस.बी.पवार)
मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर